# सनविवि

जानेवारी
२०२०

महाराष्ट्र मंडळ बंगलोर

शताब्दी महोत्सवी वर्ष (१९२० - २०२०)



**प्रकाशक :**

महाराष्ट्र मंडळ, बंगळुरू
#२८, २ रा क्रॉस, गांधीनगर
बंगळुरू- ५६०००९

**ई-मेल:**

snvv.mmbangalore@gmail.com

**संपादक मंडळ :**

प्रवरा संदीप
सरोज कलंत्रे
धनंजय चौगुले
गौरी नातू
देवश्री अंभईकर धरणगांवकर
रेखा नाईक

**तंत्र सहाय्य्य:**

कैवल्य लिमये
संदीप लिमये

**स्पष्टीकरण:**

*या अंकात प्रसिद्ध झालेल्या साहित्यात व्यक्त झालेले विचार व मते हि लेखकांची वैयक्तिक असून महाराष्ट्र मंडळ त्यास जबाबदार नाही. तसेच हे मासिक विक्रीसाठी नाही*

## *अनुक्रमणिका*

***संवाद...***

***घडामोडी – आगामी...जल्लोष शताब्दीचा***

***ललितबंध...***

***आठवणपाखरे...***

***रेशीमगाठी...***

# संवाद...

नमस्कार!

**Happy New Year!** सनविविच्या सर्व वाचकांना नववर्षाच्या शुभेच्छा!

गेल्या वर्षीपासून आपण ज्या सोहळ्याची वाट पहात आहोत, सुंदर सुंदर कार्यक्रम आयोजित करून ज्या वर्षाच्या स्वागताची तयारी करतो आहोत ते हे शताब्दी सोहळा वर्ष... २०२०! या शुभमुहूर्तावर महाराष्ट्र मंडळ बेंगळुरू, पुढील शतकी वाटचाल सुरु करत आहे.

मित्रांनो... येतं वर्षभर आपण हा सोहळा साजरा करणार आहोत. उद्घाटनाचा पहिला धमाकेदार कार्यक्रम आहे, १९ जानेवारी २०२० या दिवशी. याबद्दलची सर्व सविस्तर माहिती या अंकात आहेच. यापाठोपाठ फेब्रुवारी महिन्यात आपण साहित्य मेळावा भरवत आहोत. बंगलोरसारख्या ठिकाणी स्थायिक असलेल्या सर्व मराठी लोकांसाठी ही अतिशय महत्वाची अशी गोष्ट आहे. फक्त तरुण किंवा बुजुर्गच नाही पण अगदी लहान मुलांनाही सहभागी होता येईल अश्या या मेळाव्याचा आपण सर्व आनंद घेऊया.

मराठी घडवणे, जोपासणे तसंच स्थानिक कन्नड व इतर संस्कृतीबरोबर देवाणघेवाण करत एक उत्तम मराठी माणूस घडवण्याचे काम मंडळ गेली शंभर वर्ष सातत्याने करत आलंय आणि जोमाने करतच राहील. या “मराठी” च्या बांधणीत आपणा सर्वांचा मोलाचा हातभार लागो हीच इच्छा...

मंडळाच्या फेसबुक पेजवर आणि इतरही काही लिंक्स येत्या वर्षातील कार्यक्रमाचे अपडेट्स तुम्हाला मिळत रहातील... *so, stay tuned and join us!*

धन्यवाद...
प्रवरा संदीप

* * * * *

## महाराष्ट्र निवास विश्वस्त मंडळ

२२ डिसेंबर २०१९ पासून विश्वस्त मंडळाचे नवीन पदाधिकारी

- अजित एदलाबादकर - अध्यक्ष
- विनायक कवठेकर - उपाध्यक्ष / खजिनदार
- स्नेहा केतकर - सचिव

# महाराष्ट्र मंडळ, बेंगळुरू

# ಮಹಾರಾಷ್ಟ್ರ ಮಂಡಲ್,ಬೆಂಗಳೂರು

|| शतवर्षांचे अतूट नाते माऊली मराठीशी ||

**महाराष्ट्र मंडळ, बेंगळुरू सहर्ष आणि सस्नेह साजरा करीत आहे शतकोत्सव...**
**या निमित्ताने वर्षभर अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.**
**सर्व मराठी जनांना आग्रहाचे निमंत्रण आहे!**
**मंडळाचे मुखपत्र 'सनविवि' आणि कार्यक्रमांची माहिती मिळवण्यासाठी:**
**snvv.mmbangalore@gmail.com यावर संपर्क करावा.**
**आपल्या मराठी मित्र-परिवारालाही ही माहिती कळवावी ही विनंती.**

**Membership form link**

https://drive.google.com/open?id=1sTqNmmqujbwUAjShqx0AQmX-w56hfK-z

**Youtube channel link**

https://www.youtube.com/channel/UC9zazbhMNkUO0mZglJ4icDQ

**Instagram link**

https://instagram.com/maharashtramandalbengaluru?igshid=xb8bfko7cyjt

**Facebook link**

https://www.facebook.com/MMBlr.org/

**रेडियो सनविवि podcast**


https://anchor.fm/maharashtra-mandal-bengaluru

**Twitter handle**

https://twitter.com/mandalblr?s=03

१०० शताब्दी महोत्सव वर्ष

# घडामोडी – आगामी…जल्लोष शताब्दीचा



नमस्कार,

महाराष्ट्र मंडळ बेंगलोर, शताब्दी सोहळा उदघाटन समारंभ...

१९ जानेवारी २०२० रोजी आपण शताब्दी वर्षातील पहिला कार्यक्रम आयोजित केला आहे. जागा--Palace Ground वरील White Petal विभागातील Gardenia ह्या प्रशस्त सभागृहात हा कार्यक्रम दुपारी २. ते संध्याकाळी ९.३० पर्यंत सादर होईल.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या आहेत... माजी लोकसभा अध्यक्षा श्रीमती सुमित्रा महाजन. तसेच बंगलोरचे लोकसभा सदस्य श्री तेजस्वी सूर्य हे विशेष पाहुणे असतील.
श्री सचिन खेडेकर यांच्या बरोबर गप्पांचा कार्यक्रम होईल... तसंच युवा पिढीचे दमदार गायक, संगीतकार आणि सारेगम सारख्या स्पर्धेतल्या स्पर्धकांचे व प्रेक्षकांचे लाडके परीक्षक... श्री अवधूत गुप्ते (आणि सहकलाकार) यांचा 'जल्लोष शताब्दीचा' हा गाण्यांचा कार्यक्रम सादर होईल. ह्या सोहळ्यासाठी बंगलोरमधल्या सर्व मराठी रसिकांना आमचे आग्रहाचे आमंत्रण! जरूर या.

आजीव साभासदांस एक प्रवेशिका complementary म्हणून मिळेल. ह्या प्रवेशिकांच्या वाटपासाठी बंगलोरच्या विविध भागात काही कार्यकर्त्यांची नियुक्ती केली आहे. कृपया ३१ डिसेंबर पर्यंत तुमच्या भागातील कार्यकर्त्यांशी संपर्क साधून तुमचे नाव नोंदवा आणि ८ जानेवारी पर्यंत तुमची प्रवेशिका collect करा ही विनंती!

**Area wise list of coordinators 👇**
Anjali Kulkarni - Yelhanka, Hebbal - 9945160664
Asmita Oak - Indiranagar - 9845822644
Dhananjay Patki - Marathalli - 9886105573
Gandhali Sevak- Whitefield - 9845982110
Gauri Natu - Bannerghatta road - 9049663312
Madhura Parulekar - Jalahalli - Sanjaynagar - 9880236793
Manik patwardhan - Kormangla - HSR - 9886046987
Pooja Tambe - Jayanagar - 9880201161
Renu Karjatkar - MG Road - 9845808471
Rita Dixit - J P Nagar, Kanakpura Road - 9880106838
Vaishali torvi - Yeshwanthpur, Rajajinagar ,- 9945282646
Veena Kawthekar - Vijayanagar, Basveshwarnagar - 9448304170
Vidya Padhye - Mallesharam - 984504980
जे आजीव सभासद नाहीत त्यांनी bookmyshow वर सुवर्ण अथवा रौप्य सभासदत्व घ्यावे ही विनंती.
सुवर्ण   रु. ८०० फक्त प्रत्येकी
रौप्य   रु. ६०० फक्त प्रत्येकी

BMS link - https://in.bookmyshow.com/events/maharashtra-mandal-shatabdi-sohala/ET00120658

हे सभासदत्व घेणाऱ्यांना वर्षभरात इतर काही निवडक कार्यक्रमालाही प्रवेश विनामूल्य असेल. तेंव्हा कृपया आपली प्रवेशिका कार्यक्रमानंतरही जपून ठेवा.

**ह्याशिवाय विविध स्टॉल्स आणि मुख्य म्हणजे अगदी अस्सल मराठी खाद्यपदार्थांचे अनेक स्टॉल्स आहेत...**

**त्याचाही आस्वाद घेऊ शकाल. तेव्हा सभासदत्व लवकर घेऊन आपली जागा निश्चित करावी ही विनंती.**

**फक्त ७००--७५० जागा आता उपलब्ध आहेत. सर्वांसाठीच बसण्याची व्यवस्था *FIRST COME FIRST SERVE* असल्यामुळे, लवकरात लवकर येऊन स्थानापन्न व्हावे अशी विनम्र विनंती!!!**

*शताब्दीचा हा जल्लोष* आपल्या सारख्या रसिकांच्या उपस्थितीने द्विगुणित होणार आहे!!!
मग भेटूच १९ जानेवारीला.

कळावे,
**कार्यकारिणी आणि शताब्दी सोहळा समिती**
**महाराष्ट्र मंडळ, बंगलोर**

# *साहित्य प्रेमींसाठी खुशखबर... खुमासदार मेजवानी!!*

**महाराष्ट्र मंडळ शताब्दी वर्ष महोत्सवातील दुसरे पुष्प...**

## " साहित्य मेळावा "

दिनांक - २२ आणि २३ फेब्रुवारी २०२०

**वैशिष्ट्ये.....**

- मुलांसाठी कथाकथन
- मोठ्यांसाठी लेखन कार्यशाळा तीही सुप्रसिद्ध लेखिका ' नीरजा ' यांच्या मार्गदर्शनाखाली,
- कवितांच्या रसास्वादासाठी 'बहुभाषिक कविसंमेलन '
- ग्रंथ दिंडी
- सुप्रसिद्ध साहित्यिक ... मा. उत्तम कांबळे आणि मा. अम्रुत देशमुख यांचे 'साहित्य आणि वाचन' या विषयी विचार मंथन,
- कथांचे अभिवाचन,
- सुप्रसिद्ध लेखक, नट, दिग्दर्शक मा. निपुण धर्माधिकारी यांच्याशी मुलाखत स्वरूपात गप्पा

**विशेष सूचना- फक्त लेखन कार्यशाळेसाठी नोंदणी शुल्क - रु. १०० मात्र.**

कार्यशाळेसाठी त्वरीत नोंदणी करा. संपर्कासाठी ...

ललिता तळवलकर मो.नं. 9343851715.

स्नेहा केतकर मो.नं.9980774542.

# ललितबंध...

## नथ... नूतन योगेश शेटे

निमित्त झाले घरच्या कार्याचे. मी सोहळा वेगळा साजरा करायचा ठरवला .सगळ्या बहिणी आणि वहिन्यांनी आपापल्या नऊवारी साड्या झटकून नेसल्या. मी ठरवलं, पाहुण्यांचे स्वागत वेगळ्या पद्धतीने करावे ..प्रत्येकीला नथ आणि पुरुषांना भिकबाळी द्यावी.हल्ली सहसा आणला ,घातला न जाणारा दागिना...पण तुळशीबागेत मिळणारा अगदी साधा ऐवज..पण त्याने मांडवात आनंदाची फुलबाग फुलली. पुरुषही कानात भिकबाळी घालून सजले. कौतुकाने प्रत्येकाने साज चढवला.

पंजाबी ड्रेसमध्ये आलेल्या सख्यांनीसुध्दा नथ नाकात मिरवली."पहिल्यांदाच घातलीय नाकात नथ";"कशी दिसतेय मी?"; "किती वर्षांनी नथ घातलीय…" अश्या वाक्यांनी मांडव किलबिलला.

मांडवातून निघता निघता माझी मामी जवळ आली आणि म्हणाली "मला एक नथ आहे का शिल्लक?"

मी खरं तर गडबडीत होते, पण मामीच्या मागणीने आधी थबकले मग हरखले.

मामीला स्वागतार्ह नथ दिली गेली नव्हती कारण उशीरा आली ती.

मामाला जाऊन सहा आठ महिनेच झाले आहेत. पण माझी 65वर्षाची मामी म्हणजे आनंदाचे झाड आहे. मी तिला भेटायला जाऊ शकले नव्हते. पण माझ्या फोनसरशी माझी मामी कार्याला आली. मामाही असाच आनंदी माणूस होता, त्याच्या जाण्याने मामी एकटी पडलीय.

पण आत्ता नथ मागताना मामी मला अगदी तशीच वाटली, जशी एका भावाच्या लग्नात माझा चणिया चोली घालून मामापुढे लाजत आली होती. मामा कौतुकाने हसला होता आणि माझा प्रेमावरचा विश्वास वाढला होता.

मामी बोलत होती,"अग, तुझा मामा होता ना तोवर कधी मला नथ घालू देत नव्हता. त्याला बाकी सारं चालायचंच; नथ नाही आवडायची. आता एकदा घालून फोटो काढावासा वाटतोय. दाखवणार नाही कुणाला… माझ्यापुरताच...

मी "हो "म्हणून गर्दीत हरवले पाहुण्यांच्या, पण मामीच्या हातात माझ्या वहिनीने तिची नथ दिली.

मामी...तू अजूनही तशीच छान दिसतेस जशी माझ्या मामाला आवडायचीस तशीच. आज जेव्हा तुझ्या मनात राहून गेलेली नथ माझ्या कार्यात तुला मिळाली ना तेव्हा मन भरुन आलं. पण फोटो स्वत:पुरता ठेवू नकोस.आम्हालाही बघू दे.

आता स्वतःसाठी जग... मस्त रहा…

मामा असो -नसो, आम्ही तुझ्या नाकावर झुलणारी नथ पाहून मामाला आठवणार...

फक्त मामा गेलाय.... तुझी हौस, तुझा आनंद, आम्ही तुझी माणसं इथेच आहोत... तुझ्यासाठी...

आणि तू ...जशी मन मोहवणारी *नथच*आमच्यासाठी....

***कमलाबाई मराठे एकांकिका स्पर्धा वृत्तांत***

कमलाबाई मराठे एकांकिका स्पर्धेसाठी **श्रीमती शुभदा खरे आणि श्री गौतम उभयकर** या दोन मान्यवरांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. गेल्या अंकात स्पर्धेबद्दलच्या माहितीमध्ये हा उल्लेख अनावधानाने राहून गेला होता. तरी क्षमस्व.

# आठवणपाखरे...

## आठवणीतील वाडा संस्कृती... नीलिमा नातू

मुंबई शहराजवळच्या गावात वाढलेल्या मला "वाडा" संस्कृतीची ओळख झाली ती माझ्या मनमाडच्या काकांमुळे. मोठी सुट्टी लागली की, मनमाडला काकांकडे जायची गडबड सुरु व्हायची. दिवाळी आणि मे महिन्यात तिथे जायचे वेध लागायचे त्यामागचं एक कारण म्हणजे त्यांच्या वाड्याचं आकर्षण.

१०० वर्षांपूर्वीचा हा वाडा आजही तितकाच दिमाखात उभा आहे. हा वाडा म्हणजे खरतर पूर्वीची धर्मशाळा. हे ठिकाण देवस्थान नव्हे, तरी इथे धर्मशाळा का बांधली असावी, याचे मला कुतूहल होतंच! मग याच वाड्यात रहाणाऱ्या गाडगीळ सरांनी याची माहिती सांगितली, 'मनमाड हे रेल्वे जंक्शन असल्याने गाड्या बदलण्यासाठी प्रवाशांना तिथे राहाव लागे तेव्हा त्यांची ही गैरसोय एका मद्रासी अधिकाऱ्याच्या लक्षात आली. मग त्यांनी ही प्रचंड धर्मशाळा स्वखर्चाने बांधली. कालांतराने ललवाणी नावाच्या माणसाने ही वास्तू विकत घेतली आणि पुढे त्यांनी ही वास्तू भाडेकरूना भाड्याने दिली. याच वास्तूत माझे काका राहत होते.

रेल्वे स्टेशनला लागूनच हा वाडा आहे. वाड्यात प्रवेशासाठी मोठा लाकडी दिंडी दरवाजा, मध्ये ते छोट दार, त्यातून जा ये करायला आम्हाला खूप आवडायच. आत गेल्यावर देवडी मध्ये दोन दगडी बाक अजूनही जसेच्या तसे आहेत. दोन छोट्या चौकांच्या मध्ये असलेल्या मोठ्या चौकोनी चौकात काका राहायचे. या चौकात वीस बिऱ्हाडे गुण्यागोविंदाने रहात होती. पुढचा छोटा चौक संपला की मोठे आवार होते, तिथे डावीकडे सहा रहाटांची भली मोठी विहीर आहे. या विहिरीची मजेशीर माहिती अशी की या विहिरीला सुरवातीला पाणी लागले नाही म्हणून आणखी खोलवर खणून पाहिले पण तरीही पाणी लागलेच नाही. पण एक दिवस पावसाळ्यात या विहिरीत म्हणे वीज कोसळली आणि विहिरीत जागृत झरे सुरु झाले ते आजतागायत तसेच आहेत. पूर्ण मनमाडच्या विहिरी आटतात पण या विहिरीला मात्र नेहमी भरपूर पाणी असतं. हे पाणी नेण्यासाठी लांबून कावडीवाले येऊन पाणी भरत असत. श्रावण बाळाच्या गोष्टीत ऐकलेली कावड कशी असते ती इथेच पाहायला मिळाली.

काकांच घर मस्त चार खोल्यांचे होते. मुंबईत दहा बाय दहाच्या एका खोलीत राहणाऱ्या आम्हाला या घराचे खूप कौतुक होते. घराच्या कोपऱ्यातील खोल्यांना असलेल्या अर्धवर्तुळाकार पायऱ्यांवर बसायला फार आवडत असे. पायऱ्यांच्या बाजूला प्रत्येक घराजवळ फुलझाडे, तुळस लावलेली असे. तिथलं वातावरणच कस प्रसन्न असायचं. सकाळी सकाळी सर्वांच्या दारासमोर अंगणात शेणाचा सडा आणि रांगोळी घातलेली असायची, सगळ्या घरातून रोज तुळशीची पूजा होत असे. प्रत्येक सणाचा उत्साह पाहण्यासारखा असायचा. दिवाळीत कंदील, दिव्यांची रोषणाई, किल्ले, विविध फटाके ह्यामुळे वाडा उजलून निघे.

वाड्यातल्या मुलांचा सुट्टीचा पाढे, शुद्धलेखनाचा अभ्यास एकत्रच अंगणात होत असे. मे महिन्याच्या सुट्टीत पण धमाल असे दिवसभर दंगा करून झाला की रात्री अंगणातच घरा समोर सगळ्यांची अंथरुण टाकली जात तेव्हा वेगळीच मजा यायची गप्पांना नुसता ऊत यायचा आणि मग आकाशातील चांदण्या मोजत कधी झोप लागे ते कळत नसे. सकाळी डोळ्यावर सूर्य किरण आली की जाग यायची. तेव्हा सकाळी उठून अंगणात सडा रांगोळी घालून झाली की वाड्यातील बायका वाळवणाची तयारी सुरु करत. अंगणात कॉटवर
डाळीचे सांडगे घालून वाळवणाची सुरवात होई मग बटाट्याचा किस, साबुदाणा पापड्या, बटाट्याच्या चकल्या, कुरडया, असे अनेक पदार्थ वाड्यातील सर्वजणी दिवस ठरवून, एकमेकींच्या सवडीने एकत्रच करत असत.

हातशेवया आणि वेगवेगळ्या प्रकारचे पापड ह्या बायका आळीपाळीने आणि मदतीने करायच्या. हे असं अगदी वेगळं चित्र मला या वाडा संस्कृतीतच पाहायला मिळालं. गुण्यागोविंदाने नांदणारे ते एक गावचं वाटायचं.

कितीतरी लग्नांचे मांडव या वाड्यात पडले. तेव्हा आपल्या घरातील कार्य असल्या सारखे सगळे सहभागी व्हायचे. दसऱ्याचं सोन लुटणं असो की संक्रातीच तीळगूळ देणे असो, हळदीकुंकू, चैत्रगौर हे सगळ वाडाभर उत्साहात साजरं व्हायचं.

एखादीला जवळच जाऊन यायचं असेल तर शेजारी "आलेच मी" असे सांगून बायका बिनधास्त घराचे दरवाजे उघडे टाकून जात असतं. अहो एवढंच नाही तर छोट्या बाळांकडे सुद्धा शेजाऱ्यांकडून लक्ष ठेवले जात असे. अशा ह्या वाड्याबद्दल मनात खूप आपुलकी आणि प्रेम होतं.

लग्न झाल्यावर पुण्यात मी वाड्यात राहायला आले, मी ही एका वाडा कुटुंबाचा भाग झाले आणि मग ही वाडा संस्कृती प्रत्यक्ष अनुभवायला मिळाली.

आमचा पुण्याचा वाडा सुद्धा असाच, गुण्या गोविंदाने नांदणार गोकुळ. ह्या वाड्यातल प्रत्येक घर कस हक्काचं. एक प्रकारची सुरक्षितता होती. कधी एकटं वाटलं नाहीच. चांगलं शंभर सवाशे जणांचं मोठ्ठं कुटुंबच ते. दोन तीन पिढ्या एकत्र राहिलेली सगळी कुटुंब एकरूप झालेली. सुखात दुःखात एकमेकांना साथ करणारी माणस.

पण नंतर मात्र हळू हळू सगळी कुटुंब पांगली. परिस्थिती पालटली, कुटुंब विस्तारली, जागेची चणचण भासू लागली, थोडी आर्थिक सुबत्ता आली म्हणून तिथली कुटुंब आता नव्या पद्धती प्रमाणे स्वतःच्या मालकीच्या ब्लॉक मध्ये राहायला गेली. आता वाड्यांच्या जागीही इमारती उभ्या राहिल्या त्यांच्या कित्येक मजल्यांच्या कित्येक खणांच्या सोसायट्या, अपार्टमेंट झाल्या, पण ही वाडा संस्कृती प्रत्येकाच्या मनावर कोरली गेली आहे त्यामुळे नव्या घरात अजूनही काहीतरी चुकल्या सारखं वाटत. काहीतरी हरवल्या सारखं वाटत.

लोप पावलेली ती वाडा संस्कृती हवीहवीशी वाटणारी, सर्वांना सामावून घेणारी, सर्वांच्या सुखदुःखात सहभागी होणारी. मुलांसाठी ती संस्काराची खाणच होती.

ही संस्कृती काही काळ तरी आम्हांला अनुभवायला मिळाली हेच आमचे भाग्य म्हणायला हवे.

* * * * *

# रेशीमगाठी...

## वर पाहिजे –

- वय - २९ वर्ष, उंची - ५ फूट ४ इंच, शिक्षण - बी. टेक - कॉम्पुटर सायन्स, नोकरी - SAP labs, Bangalore, अपेक्षा - आंतरजातीय, आयटी इंडस्ट्री मध्ये काम करणारा, उंची ५'६" किंवा जास्त, इंजिनीयर, बंगलोर किंवा मुंबई येथील. संपर्क : ९७४०९३१९११, ९८३३००१४०८, indianmusicmantra @gmail.com
- वय - २५ वर्ष, उंची - ५ फूट ५ इंच, शिक्षण - बी. आर्क, एम आर्क - १ ले वर्ष, अपेक्षा - अनुरूप, संपर्क : ९४८१४७३६१३, ९४८१८४४१८८
- वय - ३४ वर्ष , घटस्फोटित, उंची - ५ फूट ५ इंच, शिक्षण - कॉम्पुटर इंजिनीअर , एम बी ए, नोकरी - Sr. Consultant at PWC , बंगलोर, अपेक्षा, - उच्चशिक्षित, शक्यतो आयटी इंडस्ट्री मध्ये काम करणारा प्रथमवर किंवा विनापत्य घटस्फोटित चालेल , जातीची अट नाही, संपर्क : ९५३८४७४७२१, madhubelorekar@gmail.com

* * * * *